## ➤ महत्त्वाचे

### सभापती चुंबळे यांचा पळसे ग्रामस्थांकडून सत्कार

**नाशिक ।** नाशिक कृउबा समितीच्या सभापती कल्पना चुंबळे यांची नाशिक कृषी उत्पन्न बाजार समिती नवनिर्वाचित सभापती निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सर्वपक्षीय पदाधिकारी आणि ग्रामस्थांतर्फे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये त्यांचा सत्कार झाला. सत्काराला उत्तर देताना चुंबळे म्हणाल्या मार्केट यार्ड मध्ये सोयीसुविधांचा झालेला अभाव दूर करण्यासह शेतकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देऊ. शासन दरवर्षी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले यावेळी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व वैभव नागरी पतसंस्था पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी जगन आगळे, संजय तुंगार, सविता तुंगार शिवाजी चुंबळे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, दीपक गायधनी, गणेश गायधनी, माजी सरपंच तथा सदस्य नवनाथ गायधनी, नंदू नरवाडे, पळसे सोसायटी अध्यक्ष खंडेराव गायधनी, बाळासाहेब सरोदे, तानाजीराव गायधनी, दिलीप गायधनी, अजित गायधनी, भाऊसाहेब गायधनी, सरपंच भाऊसाहेब गायधनी, माधवराव गायधनी, किरण चंद्रमोरे, यशवंत आगळे, रमेश गायधनी, वसंत ढेरिंगे, विष्णुपंत गायधनी, रंजन चौधरी, रामदास गायधनी, बाळासाहेब गायधनी, रामकिसन गायखे, वसंत गायधनी, सुनील माळी, संजय गायधनी, सुदाम जाधव उपस्थित होते.

### सहा गठ्ठा पद्धतीला विरोध करणाऱ्यांना नोटिसा

**नाशिक ।** महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजात सुटसुटीतपणा आणण्यासाठी अवलंबिलेल्या सहा गटापद्धतीला कार्यालयीन अधीक्षक व कर्मचाऱ्यांकडून विरोध असल्याची बाब एका तपासणीत आढळून आल्याने अशा कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजाविण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवस सुधारणा कृती आराखडा जाहीर केला आहे त्या अंतर्गत अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, प्रशासन उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक अजित निकत, पर्यावरण विभागाचे उपायुक्त नितीन पवार यांनी महापालिका मुख्यालयातील विविध विभागांना अचानक भेट देत तपासणी केली. तपासणीत सहा गट्टा पद्धतीचा अवलंब होतो की नाही हे तपासण्यात आले. सहा गटापद्धतीला कागदपत्रांची विभागणी चालू पत्र व्यवहार प्रतिक्षाधिन प्रतीक्षा दिन प्रकरणे, नियतकालिके स्थायी आदेश संचिका अभिलेख कक्षात पाठवायची प्रकरणे आणि ड वर्गीय पेपर्स अशी विभागणी झाली नसल्याचे आढळून आले वास्तविक शासनाने सहा घटका पद्धत अवलंबिण्याचे आदेश दिले असताना तशी कृती होत नसल्याने अधीक्षकांसह कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### व्ही.एन.नाईक महाविद्यालयात 'मेराकी- द आर्ट एक्झिबिशन'

**नाशिक ।** येथील क्रां.व्ही.एन नाईक शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बी.होक फॅशन डिझायनिंग विभागाच्यावतीने मेराकी द आर्ट एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये या विभागाच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले विविध कपड्यांच्या डिझाईन्स आणि कलेचे प्रदर्शन करण्यात आले. काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत भारतातील सर्व पारंपारीक कला प्रकारांचे देखील उत्कृष्ट सादरीकरण यात करण्यात आले. यात वारली, फुलकारी, कोलम, कच्छ, सांझी, बांबू आर्ट, लिप्पन, बांधणी, बटिक, पटुआ, पत्तचित्र, मिनाकरी, गढवाल, कावी आदी कलाप्रकार आकर्षक प्रकारे प्रदर्शित करण्यात आले होते. सदरच्या प्रदर्शनास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह प्राचार्य डॉ.संजय सानप, दिंडोरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे ,प्राचार्य डॉ.कैलास चंद्रात्रे, प्राचार्य डॉ.अविनाश दरेकर, नरेंद्र गिते, अविनाश महाजन, श्याम जोंधळे यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट दिली. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली फॅशन डिझायनिंग विभागाच्या विभागप्रमुख प्रा.सायली भामरे, प्रा.सोनल खैरनार यांनी परिश्रम घेतले.

### शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक समारंभ

**नाशिक ।** मविप्र समाजाच्या ॲड. विठ्ठलराव गणपतराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र संचालक रमेश पिंगळे व ॲड. लक्ष्मण लांडगे उपस्थित होते. व्यासपीठावर महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या चंद्रकला पाटील, रामदास मुरकुटे, ॲड. रामचंद्र आहेर, सहदेव जामदार आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबविणारे प्राध्यापक, पीएच.डी.धारक आणि सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात नैपूण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.चंद्रकांत बोरसे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. विद्या जाधव, क्रीडा प्रमुख डॉ. अनिता शेळके, डॉ. कैलास खोंडे, डीटीएड च्या प्राचार्या सुषमा पाटील व सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# श्री भगवतीच्या दर्शनासाठी गडावर भाविकांची मांदियाळी

## पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी घेतले सपत्नीक दर्शन



कळवण । सप्तश्रृंगगडावर वर्षभरात दोन महत्वाचे उत्सव पार पडतात. एक शारदीय नवरात्र उत्सव अन दुसरा चैत्रोत्सव. या दोन्ही उत्सवात गडावर येणाऱ्या भाविकांचा५ उत्साहात अनोखा असतो. मात्र खासकरून भक्तीचा आणि श्रद्धेचा मिलाफ चैत्रोत्सवातच बघायला मिळते.

चैत्रोत्सव म्हटला की नंदुरबार, नवापुर, धुळे, जळगाव या खानदेश प्रांतातून अनेक पालख्या, दिंडया, भाविकांचे जथ्थे सप्तशृंगगडावर पोहचू लागले आहेत. पायी प्रवास करूनही मोठा उत्साह या भाविकांच्या चेहऱ्यावर बघायला मिळतोय. यातील बऱ्याच पालखी दिंड्यांना ३० – ४० वर्षांची परंपरा आहे. चैत्रोत्सवातील प्रत्येक दिवशी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी बघायला मिळते आहे. यासह अजून मालेगाव, सटाणा, देवळा, वसाका, कळवण परिसरातले रस्ते भाविकांच्या गर्दीने वाहत आहेत. अजून दोन दिवसात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दाखल होईल. आजची देवीची पंचामृत महापूजा श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे विश्वस्त ॲड. दीपक पाटोदकर व नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सपत्नीक परिवारासमवेत केली. यावेळी स्वामी संविदानंद सरस्वती, प्रकाश पाटोदकर, आश्विन शेटे, कमलाकर गोडसे उपस्थित होते. यादरम्यान विश्वस्त संस्थेच्या कार्यालयातून देवीच्या अलंकारांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी विश्वस्त संस्थेचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहा. व्यवस्थापक तथा कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, सप्तश्रृंगगड ग्रामपंचायतीचे उपसरपंच संदीप बेनके, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य राजेश गवळी आदी उपस्थित होते. भगवतीस गुलाबी रंगाचे भरजरीचे महावस्त्र नेसविण्यात आले. दिवसभरात देवीच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी विश्वस्त संस्थेच्या अन्नपूर्णा प्रसादालयातही भाविकांची गर्दी बघायला मिळाली.

### घराघरातून वाळवणाच्या खाद्य पदार्थांची लगबग...



**सध्या महिला वर्गाकडून वाळवणाच्या प्रकारचे काम चालू असून पापड, कुरडई, वडे आदी कामात महिला मग्न झाल्या आहेत. बऱ्याचशा महिला नोकरी व काम धंद्यामुळे वेळ मिळत नसल्याने आयत्या मालाचे मागणी जास्त वाढत आहे. तसेच बचत गटांनाही मोठ्या प्रमाणात वाळवण्याचे काम मिळत आहे.**

### रेडगाव खुर्द शिवारातून वीजपंपाची चोरी

**चांदवड ।** तालुक्यातील रेडगावखुर्द शिवारातून छाया ज्ञानेश्वर गरुड (रा. रेडगावखुर्द) यांच्या शेती गट नंबर ३३४ मधून अज्ञात चोरट्याने विहिरीतून तीन एच.पी. पर्ल माधुरी एंन्टरप्राईजेस सोलर या कंपनीची मोटार व त्याचा हिरव्या रंगाचा पंप असा पंचवीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरुन नेल्याची फिर्याद छाया गरुड यांनी चांदवड पोलीस स्टेशनला दिली आहे. या घटनेचा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

# इंडो ॲथलेटिक सोसायटीतर्फे गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप




**देवळाली कॅम्प ।** भारतातील क्रीडा व आरोग्य क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या इंडो ॲथलेटिक सोसायटीतर्फे इंडो अथलेटिक सोसायटीच्या ऑफिसमध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या सहकार मी फाउंडेशनच्या मस्ती की पाठशाला या शाळेतील बांधकाम व वीट भट्टी कामगारांच्या मुलांसाठी सायकल डोनेशन प्रोग्राम घेण्यात आला. संस्थेतर्फे दर सहा महिन्याला असा प्रोग्राम घेतला जातो असे इंडो ॲथलेटिक सोसायटीतर्फे सांगण्यात आले. रनिंग ट्रेकिंग स्विमिंग व सायकलिंगची आवड जपत अनेक सामाजिक उपक्रम करणाऱ्या आज मस्ती की पाठशाळेच्या पाच मुलांना या उपक्रमात सायकल भेट देण्यात आल्या. सगळ्या सायकलींना छान फुलांचे हार घालण्यात आले होते. मुलांना इंडो ॲथलेटिक सोसायटीचे टीशर्ट भेट देण्यात आले. त्यामुळे आमची मुलं इंडो ॲथलेटिकच्या परिवारात अगदी सहजरीत्या सामावून गेली. इंडो ॲथलेटिक सोसायटीच्या सदस्यांना सुधीर कारंडे सरांनी मस्ती की पाठशाळे विषयी माहिती दिली तसेच मुलांचेही मनोगत सगळ्यांसमोर सादर करण्यात आले. त्यानंतर मुलांना सायकल देण्यात आल्या. सायकल मिळणार म्हणून सकाळी लवकर उठून तयार झालेल्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्या सारखा होता. पिंपरी चिंचवड शहरात पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचा आलेल्या या कामगारांचा खूप खडतर प्रवास असून, या सायकल डोनेशन मुळे मुलांना शाळेत जाण्यासाठी सगळ्यात मोठी मदत होणार आहे असे सहगामी फाउंडेशनच्या प्रमुख प्राजक्ता रुद्रवार यांच्यातर्फे सांगण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सदस्य मारुती विधाते यांच्यातर्फे पंढरपूर सायकल वारीला दहा हजार रुपयांचा चेक देण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून मस्ती की पाठशाळेतील विद्यार्थ्यांना सायकली भेट दिल्याबद्दल इंडो ॲथलेटिक सोसायटीतचे गजानन खैरे, अजित पाटील, गणेश भुजबळ यांचे मनःपूर्वक आभार तसेच या उपक्रमाचे उत्तम नियोजन केल्याबद्दल गिरीराज उंमरीकर, अजित गोरे, अमृता पाटील, रवींद्र पाटील, अविनाश चौगुले, निकिता चौगुले, अजित गोरे, अमित पवार प्रणव कडू, कैलासशेठ तापकीर, मारुती दवणे, श्रीकांत चौधरी, मदन शिंदे, किरण भावसार, रमेश माने सर्वांचेही संस्थेतर्फे आभार मानण्यात आले.

# जय बाबाजी भक्त परिवारातर्फे पाच महिन्यांत ४० दिवस 'जप साधना'





**ओझर ।** जय बाबाजी भक्त परिवाराच्यावतीने पाच महिन्यात ४० दिवस जपानुष्ठान आणि श्रमदान सोहळे संपन्न होणार आहे. नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथे नुकताच जपानुष्ठान व श्रमदान सोहळा संपन्न झाला.

यानंतर सध्या स्थितीत हनुमान जन्मोत्सव निमित्त अंजनेरी गड परिसरात जपानुष्ठान सोहळा सुरू आहे.आगामी काळात २८ एप्रिलपासून आठवडाभर अक्षयतृतीयाच्या निमित्ताने प्रतिवार्षिक जपानुष्ठान सोहळा संपन्न होणार आहे. यानंतर मे, जून, जुलै व ऑगस्ट या महिन्यात देखील ठिकठिकाणी जपानुष्ठान सोहळे संपन्न होणार असल्याची माहिती जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने देण्यात आली.

जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज धर्मपीठाचे पीठाधिश्वर जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी (मौनगिरीजी) महाराज यांच्या प्रेरणेने आणि प्रमुख उपस्थितीत मार्च महिन्यातील यशस्वीरित्या सोहळा संपन्न झाल्यानंतर आता एप्रिल, मे, जून, जुलै, ऑगस्ट दरम्यान ठिकठिकाणी जपानुष्ठान व श्रमदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात २८ एप्रिल ते ५ मे दरम्यान श्रीक्षेत्र वेरुळ आश्रमात अक्षयतृतीया निमित्त जपानुष्ठान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र काशी येथे १ जून ते ८ जून दरम्यान जपानुष्ठान सोहळा होणार आहे. श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी येथे १५ ते २२ जुलै दरम्यान वार्षिक तीर्थयात्रा जपानुष्ठान सोहळा तसेच श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे २९ जुलै ते ५ ऑगस्ट दरम्यान येथेही सोहळा संपन्न होणार आहे.

या विविध ठिकाणी होणाऱ्या सोहळ्या दरम्यान महायज्ञ,अखंड नंदादीप, जपानुष्ठान यांसह रोज पाहटे नित्य नियम विधी, आरती, भागवत वाचन, ध्यान, प्राणायाम, हस्तलिखित नामजप, प्रवचन, सत्संग आदी भरगच्च कार्यक्रम संपन्न होणार आहेत. श्रमेव जयते. अर्थातच 'कामात राम' अशी दिव्य शिकवण देणारे श्रमदानही यावेळी होणार आहे. मौनव्रतात आणि उपवास करत या पाच महिन्याच्या कालावधीत वेगवेगळे भाविक वेगवेगळ्या ठिकाणी तब्बल ४० दिवस जप साधना करणार आहेत. भविकांनी या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी अधिकृतरित्या बुकिंग करावी असे आवाहन जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# हद्दपार आरोपीला अटक

## गुन्हे शाखा युनिट दोनची कारवाई



**नाशिक ।** पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव व सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या आदेशानुसार नाशिक शहर व ग्रामीण हद्दीतून हद्दपार आणि फरार आरोपींवर कारवाई सुरू असून मंगळवारी गुन्हे शाखा युनिट दोनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शंकर काळे, विलास गांगुर्डे, गुलाब सोनार, पोहवा नितीन फुलमाळी, संजय पोटींदे हे उपनगर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहितीनुसार देवळालीगाव परिसरात गांधी पुतळा, रोकडोबावाडी आण्णा गणपती पुलाजवळ, हद्दपार केलेला आरोपी उभा असल्याचे कळले.

या माहितीची खातरजमा करून प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर यांच्या सूचनेनुसार सापळा रचून आरोपी साहील उर्फ पोशा राजू मांगकाली (वय २०, रा. रोकडोबावाडी, जयभवानी रोड, नाशिकरोड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध उपनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# पु. ना. गाडगीळ कलादालनात 'आम्ही दोघे ' चित्र प्रदर्शनाला प्रारंभ

**नाशिक ।** छंद जोपासून साधनेने चित्रकलेत पारंगत होता येते हे श्रीखंडे आणि देवकर यांनी सिद्ध केले आहे. कलेची उपासना करुन त्यांनी चित्रप्रदर्शन भरवले. यापुढेही अधिक परिश्रमपूर्वक काम करुन कलेचा आनंद रसिकांना द्यावा असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार प्रा. दीपक वर्मा यांनी केले.

संजय श्रीखंडे आणि दीपक देवकर यांच्या कलाकृतींचे 'आम्ही दोघे ' प्रस्तुत चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा प्रारंभ करण्यात आला. संजय श्रीखंडे वीजनिर्मिती क्षेत्रात कार्यरत होते. दीपक देवकर यांनी शाखा व्यवस्थापक पदावर बँकेत सेवा केली. स्वेच्छानिवृत्ती घेतल्यावर दोघेही आपल्या चित्रकलेच्या छंदात रममाण झाले. त्यांच्या सुंदर कलाकृतींच्या प्रदर्शनाचे नाशिकरोडला





स्टारझोन मॉलमध्ये पासपोर्ट ऑफिस शेजारी पु.ना. गाडगीळ ॲन्ड सन्सच्या कलादालनात काल शुक्रवारी (दि.४) या सामूहिक चित्रप्रदर्शनाचे उदघाटन ज्येष्ठ चित्रकार प्रा. दीपक वर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार व कलासमीक्षक संजय देवधर, ज्येष्ठ वास्तू विशारद भालचंद्र चावरे, बिल्डर संदिप ठाकूर, पीएनजीच्या प्रतिनिधी वर्षा भावसार आदी उपस्थित होते. सर्वांनी दोघांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राजा पाटेकर, विजय थोरात यांच्यासह अनेक कलारसिक उपस्थित होते.

या प्रदर्शनात संजय श्रीखंडे यांची पेन्सिल माध्यमात चितारलेली वास्तववादी चित्रे बघायला मिळतील. दीपक देवकर यांनी जलरंगात रंगवलेली निसर्गचित्रे, काळ्या शाईने रेखाटलेली स्केचेस व काही अमूर्त चित्रे मांडण्यात येणार आहेत. सुमारे १०० चित्रे कलारसिकांना रविवारपर्यंत दररोज सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत बघता येतील. नाशिककरांनी प्रदर्शनाला भेट देऊन दोन्ही कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त शुक्रवारी 'इफसी २०२५' चर्चासत्र

**नाशिक ।** २०२७ मध्ये नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे. त्या औचित्याने शुक्रवारी विनामूल्य चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. फायर अँड सिक्युरिटी असोसिएशनतर्फे 'इफसी २०२५ ' हा महत्वपूर्ण उपक्रम ११ एप्रिल रोजी दुपारी २ ते रात्री ८ या वेळेत कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात होईल. नाशिक चॅप्टर अध्यक्ष हर्षद भामरे आणि सेक्रेटरी आनंद दीक्षित यांनी अशी माहिती दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिकेचे अग्निशमन विभाग प्रमुख संजयव बैरागी, एमआयडीसीचे विभागीय अग्निसुरक्षा अधिकारी अतुल मंगलकर हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी 'कुंभमेळ्यातील गर्दी नियंत्रण व्यवस्थापन' याविषयी राजेश शिर्के मार्गदर्शन करतील. राहूल बजाज 'सायबर गुन्हे, धोके व हानी' याबाबत तर निवृत्त मेजर प्रकाश कापडे 'एआय आधारित सीसीटीव्ही यंत्रणा ' याविषयी माहिती देतील. 'कुंभमेळ्यात महिला सुरक्षितता' या विषयावरील चर्चासत्रात डॉ. अश्विनी पेखळे, प्रा.शुभदा चाफेकर, एसीपी संगीता निकम व आरजे सतरंगी ऋचा सहभागी होणार आहेत. अधिक माहितीसाठी ९४२२७५८०५८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या विनामूल्य उपक्रमात शासकीय अधिकारी व कर्मचारी, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझाइनर, तज्ज्ञ अभियंते, उद्योजक, औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञ, सल्लागार, कंत्राटदार तसेच ज्यांना या विषयात रुची आहे अशा नाशिककरांनी सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रिय अध्यक्ष श्रीनिवास वल्लरी, सेक्रेटरी दिपेन मेहता, खजिनदार निमित सेठ, विभागीय संचालक चिंटू आशर व सहकाऱ्यांनी केले आहे.

### कडक उन्हामुळे आग लागण्याचे प्रकार वाढले

**इंदिरानगर ।** गेल्या काही दिवसांपासून तीव्र उन्हाळा जाणवू लागला आहे त्याचबरोबर आग लागण्याच्या घटनांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. असाच प्रकार इंदिरानगर येथील सायकल ट्रॅक येथे मंगळवारी (दि.८) दुपारी २ वाजेच्या दरम्यान सायकल ट्रॅकमध्ये असलेल्या वाळलेल्या गवताला आग लागली किंवा लावण्यात आली हे समजू शकले नाही मात्र सुरवातीला किरकोळ वाटणाऱ्या आगीने थोडयाच वेळात रौद्र रूप धारण केल्याने हळूहळू परिसरात आग पसरण्यास सुरवात झाली. परिसरात मोठ्या प्रमाणात सुकलेली झाडे आणि पालापाचोळा असल्याने आग भडकली; मात्र सायकल ट्रॅक शेजारी असलेल्या बंगलामालकांनी, जवळपास असलेल्या सोसायटीच्या सदस्यांनी प्रसंगावधान राखत लागलेल्या आगीवर नळीने व इतर भांड्याने पाणी टाकण्यास सुरवात केल्याने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

### इश्रे संघटनेच्या नाशिक शाखेचा शुक्रवारी पदग्रहण सोहळा

**नाशिक ।** इश्रे- इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग, रेफ्रिजरेटिंग व एअर कंडिशनींग इंजिनिअर्स या संस्थेच्या नाशिक शाखेच्या कार्यकारी मंडळाचा शपथग्रहण समारंभ शुक्रवारी (दि.११) आयोजित करण्यात आला आहे. गोविंदनगर येथील हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन येथे नूतन अध्यक्ष वरुण तिवारी, सचिव अनिकेत चौधरी व सहकारी पदग्रहण करतील. अशी माहिती मावळते अध्यक्ष अश्फाक कागदी यांनी दिली. यंदा नाशिक शाखेला १८ वर्षे पूर्ण होत आहेत. शपथग्रहण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इश्रे संस्थेचे राष्ट्रीय सचिव मिहीर संघवी, विभागीय संचालक एजाज काझी, जीएसटी सहायुक्त चेतनसिंह राजपूत उपस्थित राहणार आहेत. तसेच आगामी अध्यक्ष मंगेश सोनवणे, खजिनदार अभिषेक पहाडी, कार्यकारिणी सदस्य अनिता बोराडे, गुलाम हुसेन, सतीश सूर्यवंशी, प्रसाद वाणी, सारंग दिडमिशे, रोहिणी मराठे आणि केदार रत्नपारखी, राहूल गोवर्धने, फर्नांडिस स्टॅन्ली, मुकूंद होळकर, वैभव जोशी, अमित सातपुते, योगिता वाजे, संजय निकम, धनंजय पवार, सुरेश दिडमिशे, रऊफ शेख, सचिन सावे आदी मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

### विभागीय लोकशाही दिन, महिला लोकशाही दिन मंगळवारी होणार

**नाशिक ।** येथील विभागीय आयुक्त कार्यालयात मंगळवारी (दि.१५) विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विभागीय महसूल उपायुक्त जितेंद्र वाघ यांनी दिली आहे. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने लोकशाही दिन उपक्रम मंगळवारी होणार आहे. नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालय येथे सकाळी ११ वाजता होणारा विभागीय लोकशाही दिन कार्यक्रम विभागातील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात दाखल झालेली प्रकरणांबाबत तक्रारदार समाधानी नसतील तर तेच या लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल करु शकतात. दरम्यान, याच वेळेस विभागीय महिला लोकशाही दिनाचेही आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेद्वारे सोडवणूक करण्यासाठी या दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मनसेचे गोदापात्रात उतरून आंदोलन

## गोदावरी नदीच्या प्रदूषणाच्या प्रश्नावरून मनसे आक्रमक

**नाशिक ।** नाशिक-त्र्यंबकेश्वरला आगामी दीड-दोन वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असून, गोदेत अमृतस्नानाची पर्वणी साधण्यासाठी साधूसंतांसह कोट्यवधी भाविक येणार आहेत; परंतु गोदावरीला प्रदूषणाचा विळखा पडला असून, याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी (दि.९) रामकुंडात उतरत जोरदार आंदोलन केले.

मनसेतर्फे गोदावरी नदी प्रदूषण मुक्त व्हावे याकरिता साधूसंतासह मोठ्या संख्येने मनपा प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाविरोधात आंदोलन केले. शहरातील गोदावरीसह सर्व नद्या लवकरात लवकर प्रदूषण मुक्त व्हावा, २०२७ मध्ये येणारा कुंभमेळा होणार असून, गोदावरी प्रदूषणमुक्त व्हावी, तात्पुरत्या स्वरुपात उपाययोजना नको अशी मागणी करण्यात आली. गोदेचे पाणी पिण्यायोग्य होत नाही तोपर्यंत आंदोलन याच प्रकारे सुरू राहील. मनपा व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दूषित पाणी पिण्यासाठी देतानाच या पाण्याने अंघोळ घालण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. याप्रसंगी मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज घोडके, संदीप किरवे, महिला प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, विभाग अध्यक्ष योगेश दाभाडे, सचिन सिन्हा, सत्यम खंडाळे, नितीन माळी, बंटी कोरडे, धीरज भोसले, विश्वास तांबे, शहर उपाध्यक्ष सचिन रोजेकर, नवनाथ जाधव, ज्ञानेश्वर बगडे, अतुल पाटील, विजय अहिरे, नीलेश शहाणे, मिलिंद कांबळे, नवनाथ कोठुळे, प्रकाश गोसावी, दत्ता पवार, तुषार गांगुर्डे, रामदास खैरनार उपस्थित होते.






## पोर्टलच्या अद्ययावतीकरणामुळे 'आपले सरकार' सेवा राहणार तात्पुरती खंडित




**नाशिक ।** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडून १० ते १४ एप्रिल २०२५ (सोमवार) दरम्यान 'आपले सरकार' पोर्टलवर नियोजित देखभाल आणि हार्डवेअर अद्ययावत करण्याचे काम करण्यात येणार आहे. या कालावधीत 'आपले सरकार सेवा पोर्टल' वरील सर्व सेवा आणि प्रणाली काही काळासाठी अनुपलब्ध राहतील. दि. १० ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत बहुतांश दिवस सार्वजनिक सुट्ट्या असल्यामुळे, नागरिकांनी, आपले सरकार सेवा केंद्र/सेतू केंद्र चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, ग्रामपंचायतींनी तसेच शासनाच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांनी आपापल्या सेवा संबंधित कामांचे नियोजन पूर्वीच करावे, असे आवाहन माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन यांनी केले आहे.

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रूथ' चित्रपटाचे १४ एप्रिलला प्रसारण

**नाशिक ।** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित एका माहितीपटासह, चित्रपटाचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विविध समाजमाध्यमांवरून तसेच दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रसारण करण्यात येणार आहे. या दिनानिमित्ताने महासंचालनालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची यावर्षी १३४ वी जयंती साजरी करण्यात येत आहे. या जयंती दिनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने सकाळी ११ वाजता 'महापुरुष डॉ.आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण आणि दुपारी १ वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रूथ' या चित्रपटाचे प्रसारण करण्यात येणार आहे. तसेच दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: द अनटोल्ड ट्रूथ' या चित्रपटाचे दुपारी १.३० वाजता प्रसारण करण्यात येणार आहे.

'महापुरुष डॉ. आंबेडकर', या माहितीपटाचे एक्स, फेसबुक, यूट्यूब आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: द अनटोल्ड ट्रूथ' चित्रपटाचे प्रसारण एक्स या समाजमाध्यमावर होणार आहे. महासंचालनालयाच्या समाज-माध्यमांच्या पुढील लिंकवर हे कार्यक्रम पाहता येतील.

# चिंचोलीच्या भूमिकन्येची दुबईतील कंपनीत निवड

## पुण्याच्या डी. वाय. पाटील कॉलेजमधून मिळाली प्लेसमेंट

**नाशिक ।** चिंचोली, ता. सिन्नर येथील वंदना आणि प्रभाकर बाबुराव दराडे यांची कन्या पुणे येथील डी.वाय. पाटील इंजीनियरिंग कॉलेजची विद्यार्थिनी अपूर्वा प्रभाकर दराडे हिला दुबईच्या नामांकित "पोलारीस इंटरनॅशनल इंडस्ट्रीज्"मध्ये प्लेसमेंट मिळाली आहे.

घरच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द,चिकाटी, आत्मविश्वासाच्या जोरावर तिने यश मिळवले असून, तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अपूर्वा हिने राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषी इंग्लिश मीडियम स्कू, नाशिकरोड येथे माध्यमिकपर्यंत शिक्षण पूर्ण केले. पुढे गुरु गोविंद सिंग पॉलिटेक्निकमधून सिव्हील इंजिनिअरिंगचा डिप्लोमा आणि सध्या पुण्यातील डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमधून बीई सिव्हीलच्या शेवटच्या वर्षाचे शिक्षण घेत आहे.

> सिव्हील पदविका करतांना मी खूप मेहनत केली. रात्रंदिवस अभ्यास केला. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. मला शिष्यवृत्ती मिळाली आणि मी पुणे येथील डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये गेली. अनेक आव्हानांचा सामना केला. पुस्तकांसाठी पैसा नाही आणि समाजाचा दबाव; पण मी स्वतःवर विश्वास ठेवला. आज या परिश्रमाचे दुबईतील कंपनीत निवड झाल्याबद्दल चीज झाले आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्य कितीही कठीण असले तरी हार मानू नका. तुमचा आजचा संघर्ष उद्या तुमची ताकद बनेल. प्रयत्न करत राहा, शिकत राहा, यश नक्की मिळेल.
>
> **- इंजि. अपूर्वा प्रभाकर दराडे**



महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे आणि निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील प्रगतशील शेतकरी रामदास सोनवणे यांची ती भाची आहे.

यावेळी अपूर्वाचा मांजरगाव येथे लिलाबाई दादा सोनवणे आणि मनुबाई बाबुराव दराडे या दोन्ही आजींच्या हस्ते शाल देऊन, पेढे भरवून कौटुंबिक सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब सोनवणे ,प्रभाकर दराडे, संतोष ढगे, रामदास सोनवणे, ईश्वर सानप (बोकडदरे), वंदना दराडे, सुरेखा सांगळे, गायत्री सानप, साक्षी सांगळे, श्रद्धा सोनवणे, श्रेया सोनवणे, श्रावणी सोनवणे, मल्हार सानप उपस्थित होते. अपूर्वचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# महापालिकेत ए.आय. प्रशिक्षण कार्यशाळा

**नाशिक ।** महापालिका प्रशासन विभागाच्यावतीने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शहर प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले.



या कार्यशाळेच्या प्रारंभी एम.के.सी.ल. (MKCL) चे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम, सनव्यवयक मकरंद बेवलकर आणि नाशिक विभागाचे प्रमुख सुभाष पाटील यांचे स्वागत अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले, "शासनाच्या निर्देशानुसार सुरु असलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याचा एक भाग म्हणून या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी उपस्थित विभाग प्रमुख, खातेप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे विविध पैलू समजावून सांगितले. AI तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासनाच्या कामकाजात अधिक गतिमानता, कार्यक्षमता आणि निर्णयक्षमतेत वाढ कशी करता येईल याचे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी सोप्या व समजण्यासारख्या भाषेत केले.

महापालिका प्रशासनातील विविध विभागांमध्ये AI चा वापर करून अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख सेवा कशा पुरवता येतील याविषयीही सखोल माहिती या प्रशिक्षणात देण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून नाशिक महानगरपालिका प्रशासनाच्या डिजिटल युगातील वाटचालीस नवे बळ मिळाले असून, भविष्यातील विकासाच्या दिशेने हे एक सकारात्मक पाऊल ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अष्टपैलू व्यक्तिमत्वाची गुणी कलाकार- कीर्ती नागरे

**लहानपणापासून घरातूनच अभिनयाचे बाळकडू मिळालेल्या कीर्ती प्रकाश नागरे या गुणी कलाकाराने आपल्या कसदार अभिनयाने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिच्याबद्दल थोडसं...**

नाशिकची रहिवाशी असलेल्या कीर्ती यांनी फक्त अभिनयापुरते स्वतःला सीमित न ठेवता आपल्यातील इतर कलागुणांनाही वाव देण्याचा लहानपणापासून प्रयत्न केला आहे. एक क्रीडापटू, गिरी भ्रमंतीकार अर्थात टेकर, लेझीमपटू, उत्कृष्ट वक्ता म्हणूनही त्यांची ओळख आहे. कळसुबाईचे शिखर त्यांनी अनेकदा सर केले तर अनेक अवघड गडकोट-किल्ले लीलया पादाक्रांत केले आहेत. नाशिकच्या प्रसिद्ध गुलालवाडी व्यायामशाळेच्या लेझीम पथकातही त्या लेझीमवर ठेका धरतात. खेळ, व्यायाम, वक्तृत्व, गिरीभ्रमण, विविध छंद ते अभिनय असा सुंदर मिलाफ त्यांनी त्यांच्या आजपर्यंतच्या जीवनप्रवासात घडवून आणला आहे. कीर्ती यांचे आजोबा उत्कृष्ट क्रीडापटू तथा मैदानी खेळांचे प्रशिक्षक होते. त्यांचे पिताश्री कसलेले नाट्य कलावंत होते. ते नाशिकच्या मायको (बॉश) कंपनीत नोकरीला होते. मायको फाईन आर्ट्‌तर्फे अनेक नाटकांमध्ये त्यांनी विविध भूमिका साकारलेल्या आहेत. त्यांच्याच अभिनयाचा वारसा कीर्ती यांच्याकडे आला आहे. कीर्ती यांनी लहानपणापासून अनेक नाटके, एकांकिकांमध्ये विविध आणि मिळेल त्या भूमिका केल्या आहेत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कामगार कल्याण मंडळाच्या राज्य नाट्य स्पर्धेत त्यांनी यशस्वी सहभाग नोंदविला आहे. गणेशोत्सव असो व अन्य सांस्कृतिक कार्यक्रम असो, त्यात अभिनय सादर करण्याची त्यांनी संधी गमावली नाही.

चंद्र जिथे उगवत नाही, जोगवा, तीन पैशांचा तमाशा यासह अनेक दर्जेदार नाटकांमध्ये कीर्ती यांनी कसदार भूमिका वटविल्या आहेत. याशिवाय आनंद ओवरी, ऍनिमल प्लॅनेट, तनमाजोरी, पिंडकौल (लेडी डॉन) नाटकांमध्ये भूमिका केल्या आहेत. "जय अठरा भुजा सप्तशृंगी माता" या मराठी चित्रपटात कीर्तीने सहकलाकार म्हणून भूमिका केली. याशिवाय उर्फी, शॉर्ट फिल्म "देणगी", "पोरखेळ", "कमला का हमला", "गुलकंद" यामध्येही काम केले आहे. त्याचप्रमाणे "क्राईम डायरी" सिरियलमध्ये विविध भूमिका केल्या. "सुंदरा मनात भरली" या कलर्स मराठीवरील सिरियलमध्ये सखुची भूमिका केली. झी मराठीवरील "तुझ्या माझ्या संसाराला आणि काय हवं", कलर्स मराठीवरील "जय योगेश्वर जय शंकर" सिरियलमध्ये गावकऱ्याची भूमिका केली आहे. कलर्स मराठीवरील "पिरतीचा वणवा उरी पेटला", "सावली होईल सुखाची" या सन मराठीवरील सिरियलमध्ये भूमिका साकारल्या आहेत. अशा एक ना अनेक नाटक, वेब सिरीज, चित्रपट आणि सिरियल्समध्ये कीर्तीने आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला आहे. अजूनही त्या मिळेल भूमिका करण्याचा प्रयत्न करीतच आहेत. चिकाटी, मेहनत, संघर्ष, सोशिकता आणि प्रतीक्षा या बळावर या क्षेत्रात तग धरण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. उच्चशिक्षित असलेली ही गुणी कलाकार सांस्कृतिक नाशिक नगरीची रहिवाशी आहे.











सांस्कृतिक

पूजा भावसार

९३२६९१४७०१

